म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५६३

निरंजन उजगरे

# परिच्छेद

REFBK-0025488
REFBK-0025488

संदर्भ काव्य
~~२५६७~~ २५६३
२५४८८
१५।११।८७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्र. मा. पद्दा )
५०००-११-८६

परिच्छेद

कविता संग्रह

**नवे घर** १९७७

**दिनार** १९७९ (महाराष्ट्र राज्य पारितोषिक)

# परिच्छेद

निरंजन उजगरे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५४८८
संग्र. शाखा (स्थळ ग्रंथ)

REFBK-0025488
REFBK-0025488

पहिली आवृत्ती : २८ जून १९८७
© १९८७, निरंजन उजगरे

मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे

छायाचित्र : रमेश मुळ्ये

छायाचित्र-संकल्पना : अनिल उजगरे

किंमत वीस रुपये

प्रकाशक
सौ० अनुपमा उजगरे
सी-९, फ्लॅट-१, वीणानगर,
मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०००८०

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

वितरक
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

आई–बाबा,
ताईआत्या–मंगेशमामा,
तुमच्यासाठी....

# अनुक्रम


| | |
|---|---|
| अवघे आभाळ | १ |
| बेट | २ |
| ढग | ३ |
| शुभ्र सडा | ४ |
| पोपट | ५ |
| बस | ६ |
| काही तिनोळी | ७ |
| शीळ | ८ |
| गुपित | ९ |
| तुझ्या कविता | १० |
| क्रॉसस्टिच | १२ |
| नातं | १३ |
| मींड | १४ |
| कविता वेलीसाठी | १५ |
| गोष्ट | १६ |
| सामान | १९ |
| दंव | २० |
| आजोबा | २१ |
| फिनिक्स | २२ |
| उमज | २३ |
| फुंकर | २४ |
| बगीचा | २५ |
| बहर | २६ |
| तलाव | २७ |
| गर्भखूण | २८ |
| अर्थ | २९ |
| पापुद्रा | ३० |
| पाकोळ्यांच्या राज्यात | ३१ |
| परिच्छेद | ३२ |
| गृहप्रवेश | ३३ |
| मूड | ३४ |
| पाऊस | ३५ |
| मित्रा | ३६ |
| जन्मार्थ | ३७ |

| | |
|---|---|
| आजीचे डोळे | ३८ |
| माझं घर | ३९ |
| गवताविषयी थोडंसं | ४० |
| पडझड | ४१ |
| समाधान | ४२ |
| दिड्दा | ४३ |
| प्रवास | ४४ |
| बॅग | ४५ |
| मजल | ४६ |
| स्वस्चौकट | ४७ |
| टाळेबंदीची कविता | ४८ |
| कागदी तारा | ४९ |
| शिल्प | ५१ |
| मनाली | ५२ |
| सहज | ५३ |
| गुहा | ५४ |
| नंतर असं झालं | ५५ |
| एका दंगलग्रस्त खेड्यात | ५६ |
| जहर | ५८ |
| मेल्यानंतर | ५९ |
| सौदा | ६० |
| किंवा | ६१ |
| संस्था | ६२ |
| घोडे | ६३ |
| पक्षी | ६४ |
| कुत्रा | ६५ |
| युद्ध | ६६ |
| किनारा | ६७ |
| ज्ञानी | ६८ |
| घर | ६९ |
| झोपाळ्याचा मृत्यू | ७० |
| संदेश | ७१ |
| सुगंधी माती | ७२ |

श्री० श्री० पु० भागवत
आणि
श्री० राम पटवर्धन
यांचा ऋणनिर्देश केल्याशिवाय
'परिच्छेद' अपूर्ण राहील.

फुलांच्या मांडवाखाली टपटपणारा — पहिला प्रवास
निवडुंगाच्या फडात बोचकारलेला—दुसरा प्रवास
फुललेल्या निवडुंगाच्या शोधात—पुढचा प्रवास...



# अवघे आभाळ

अवघे आभाळ
श्वासांना आधार,
मनाच्या पापण्या
ओलावती.

अवघे आभाळ
राव्यांचे राऊळ,
पंखांनी मृदुंग
वाजविती.

अवघे आभाळ
भगवे काहूर,
दिव्यांची चाहूल
दूरवरी.

२६·११·७६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# बेट

जिथे फक्त आपण असतो,
असे एक बेट असते.

इथल्या गर्द वनराईत
लसलसते उन्ह सहज झिरपते
आणि आपल्या दुखऱ्या तानांची
समज इथल्या वाऱ्यांना असते.

ऐकू येतात आपल्याला इथे
आश्वासक शब्द अदृश्यातले
आणि इथले समजूतदार किनारे
हळुवार झेलतात
आपल्या पावलांचे जड ठसे.

इथे फक्त आपण असतो :
एक बेट....

नोव्हेंबर ८१

## ढग

मी खिडकीबाहेरच्या आकाशात पाहिलं.
माझ्या ओळखीचा ढग
कुठल्याशा दिशेने सरकत होता.
मी हात केला—
ढग सरकतच होता.

मी घराबाहेर,
अंगणाबाहेर,
घरापुढील रस्त्याबाहेर,
वेशीबाहेर, माळाबाहेर,
बाहेर—

नंतर कित्येक वर्षांनी,
मी माझ्या घरावर
अनावर बरसत होतो....

१९.९.७८

# शुभ्र सडा

हिर्व्या-हिर्व्यातून हुंदडत्या,
वळणावर मातीच्या,
बागडखेळ करडांचा,
शुभ्र सडा....

कर्ड्या-कर्ड्यातून धूसरल्या,
काठावर घाटाच्या,
तरंगसूर बगळ्यांचा,
शुभ्र सडा....

बगळ्या-बगळ्यातून झिरझिरत्या,
सावलीतून पावसाच्या,
घमघमत्या मोगरीचा,
शुभ्र सडा....

२४·६·८०

## पोपट

आगगाडीच्या खिडकीबाहेरून पळणारी
हिरवीगार जमीन
एकदा धिटाई करून आत शिरली.
मी मलाच वाकुल्या दाखवीत
जमिनीबरोबर पळून गेलो....

आज माझ्या कोंदट खोलीच्या खिडकीवर
एक हिरवागार पोपट आला;
मला वाकुल्या दाखवीत उडून गेला....
....

३०.८.७८

# बस

स्वप्नातून नुकत्याच बाहेर पडणाऱ्या रस्त्यावरून
कॉर्पोरेशनची लालसर बस
शहराच्या दिशेने सरकत असते.

निळ्या गणवेषातल्या फुलपाखरांची टोळी
मागच्या दाराने धुमाकूळ घालीत
पुढच्या दाराने निघून जाते—

कॉर्पोरेशनची लालचुटुक बस,
शहराच्या दिशेने बागडू लागते....

३०.८.७८

# काही तिनोळी

पाऊसपाण्याच्या गप्पांमध्ये
तू विसरलीस सगळेच ऋतू;
आषाढाचे मेघच माझं सर्वस्व....

●

ढग कसा शहाण्यासारखा
थोडाच बरसून निघून गेला;
मी थोडाच निघून अजून बरसतोय....

●

रानफुलांना वय विचारलं.
फुलं हसून इतकंच म्हणाली,
'आम्ही गवतावर गाणी लिहितो....'

●

माझ्या घरावरून कितीदा तरी
पक्ष्यांचे थवे झंकारत गेले;
मी अजून पंखांच्याच प्रतीक्षेत....

●

फुलांच्या मांडवाखाली टपटपणारा—पहिला प्रवास,
निवडुंगाच्या फडात बोचकारलेला—दुसरा प्रवास,
फुललेल्या निवडुंगाच्या शोधात—पुढचा प्रवास....

७.७.७७

## शीळ

शीळ घुमली घुमली
तिच्या खुळात श्यामली,
फांदी झुकली झुकली
तिच्या उरात पाकळी....

वाट वळली वळली
तिच्या कवेत चांदणी
सांज चुकली चुकली
तिच्या उरात सावली

लाट फुटली फुटली
तिच्या श्वासात सावरी,
रात फुलली फुलली
तिच्या-तिच्यात दाटली

१-६-८३

# गुपित

डोळ्यांचे डोळ्यांना
पुसावे गुपित
ओठांना सांकडे
घालू नये.

ओठांचे ओठांना
पुसावे गुपित,
श्वासांना शपथ
घालू नये.

श्वासांचे श्वासांना
पुसावे गुपित
उघड्या डोळ्यांनी
पाहू नये.

१४·११·८०

## तुझ्या कविता

तुझ्या कृश बोटात अंगठी घालताना,
तुझ्या राबलेल्या भूतकाळाचा आलेख
माझ्या बोटांना स्पष्ट दिसला.
मी माझ्या बोटांत
तुझी बोटं विरघळवून घेतली....

●

तू इतकं सांगूनसुद्धा
गजरा आणायचं पुन्हा विसरलोच—
नंतर तुझ्यावर कविता लिहीत बसलो!
आजही म्हणतेयस, "गजरा आणा";
डोळ्यांत मात्र तुझ्या फुललीय
माझी आगामी कविता....

●

माझ्या चिटोऱ्यावरच्या कविताही
काळजीपूर्वक जपून ठेवल्यास,
सुबक अक्षरात वहीवर लिहिल्यास.
इतकं पांगळं करू नकोस—
तू गेलीस तर,
कविताही मला सोडून जातील....

●

मला मध्येच जाग येते.
तू झोपलेली असतेस, बाहुलीच्या पापणीसारखी;
तुझ्या हाताच्या तळव्यावर
मी अलगद हात ठेवतो—
लाजाळूच्या पानांसारखी
तुझी बोटं मिटून जाताना,
मी दाट झोपी जातो.

१·८·७७

## क्रॉसस्टिच

माझा यशस्वी दिवस
संपत आलेला असतो,
उनाड, स्वच्छंद.

मी परततो तेव्हा,
घराला, मुलांना आणि स्वतःला
नीटनेटकं तयार करून
तू बसलेली असतेस पायरीवर,
माझी वाट पहात.

आपण घरात येतो;
मी नवीन टेबलक्लॉथ पहातो.
हॅट घालून नाचणारी मुलगी
भरलेली असतेस तू,
क्रॉसस्टिचमध्ये....

२०·३·८०

## नातं

माझ्यातून फुटणाऱ्या आनंदाच्या ताना
तुझ्या लकेरींतून झिरपू लागल्या
तेव्हा आपण जवळ आल्याचं
मला प्रथम जाणवलं.

पुढे एकदा तुझ्या अश्रूंची चव
मला माझ्या अश्रूंसारखीच वाटली;
तेव्हा आपल्यातल्या संबंधावर
माझा विश्वास बसू लागला.

बरेच ऋतू उलटून गेल्यावर,
आपण एकमेकांना सांभाळून घेऊ लागलो;
तेव्हा आपल्यातल्या नात्याचा
शोध संपलेला होता....

२४·८·८२

# मींड

किलकिलत्या दारातून
आतुरल्या खोलीभर
सतारीच्या तारांचं किलकिलणं.

लवलवत्या ज्योतीतून
सावरअंगी दुलईवर
सतारीच्या तारांचं घमघमणं.

गुंफलेल्या बोटांतून
पूर्वेच्या मेंदीवर
सतारीच्या तारांचं किलबिलणं...

१०.१०.८०

# कविता वेलीसाठी

कुशीत शिरून तुझ्या आईच्या
निरागसपणे तू लुचताना,
तुझ्या तळव्यांवर दिसली मला
मेंदीची उमलणारी पहाट....

आमचं स्वप्न साकारणारी
तू एक नाजुक वेल.
ठाऊक आहे,
आधाराच्या काठ्यांपुरती
असतात असली वत्सल नाती—
वाढत जाशील,
मांडवावर फुलशील....

अशाच एका सायंकाळी,
एकमेकांना सावरत-सावरत
आम्ही येऊ मांडवाखाली;
उमलत्या कळ्या सुरकुतल्या हातांनी
कुरवाळत-कुरवाळत,
विरघळून जाऊ मांडवाखाली....

एप्रिल १९७६

# गोष्ट

. १ .

किंचित प्रौढ पिंपळाच्या पानावर
इवलाले पंख निवान्त विस्तारून
विसावलेल्या फुलपाखरासारखा
तुझा निरागस तळवा माझ्या तळहातावर.
बरीच रात्र झाल्याची मला जाणीव.
मी तुला गोष्ट सांगतोय.

तुझ्या डोळ्यांतलं
हुश्शार ससोबाचं कौतुक
हळू-हळू शिरत चाललंय,
तुझ्या स्वप्नांच्या पारदर्शक राज्यात.

मी अजून गोष्ट सांगतोय
आणि तू झोपलासदेखील.
माझी गोष्ट आता मलाच ऐकू येतेय.
आजूबाजूला वाऱ्याची अस्वस्थ सळसळ;
तुझा तळवा अजूनही निवान्त
माझ्या तळहातावर.

फुलपाखरू उडण्याआधी
पिंपळाचं पान गळणार नाही
ह्याचा हवाला कोणी द्यावा ?
माझेही डोळे आता मिटत चाललेयूत....

.२.

ठेवून जाणार आहे तुझ्यासाठी
चार भिंतींचा एक चौकोन
आणि दरवाजा
एका कुलपाच्या केविलवाण्या संरक्षणासकट.
आजुबाजूला वावरणारे
दहशती बुटांचे आवाज
ऐकू न शकणारे माझे कान
मी बरोबर घेऊन जाईन म्हणतो....

तुझ्या डोळ्यांतील
वाढत्या आत्मविश्वासाच्या किरणांसाठी
ठेवून जाणार आहे शुभेच्छा
आणि माझ्या शरीराला चिकटून गेलेला
हा पराभूत सावल्यांचा अंगरखा,
माझ्याबरोबर निघून जाईल.
हे बरं आहे....

अजूनही कधी-कधी
माझा हात हातात घेऊन
मला गोष्ट सांगण्यासाठी गळ घालतोस.

खरं तर तेव्हा,
मलाच ऐकायची असते
दिवसेन्‌दिवस कणखर होत असलेल्या
तुझ्या तळव्याच्या रेषांमधून,
सळसळत जाणारी एखादी पोलादी गोष्ट—
गोष्ट :
मी कधीही न ऐकलेली,
जी बरोबर नेता आली नाही तरी,
निदान ऐकून जावी म्हणतो....

फेब्रुवारी १९८७

# सामान

आमच्या वाट्याला आलेलं
बाबांचं जुनं सामान
अधिकच जुनं झाल्यावर ठरवलं,
सगळं सामान बदलून टाकायचं;
नवं, चकचकीत सामान घरात आणायचं....

उजाडला दिवस,
जुनं सामान घराबाहेर काढण्याचा.
माझं बाळपण जोजवणारी खाट हलवताना
हललंच आत कुठेतरी—
लाकडी कपाटाचे कप्पे वापरण्यावरून
झालेली आम्हा भावंडांची भांडणं
आज निःशब्द होती,
अख्खं कपाट हललं तरी—
मन थकून गेलं सामान हलवता-हलवता....

माझा लहान मुलगा अजूनही उत्साहाने
आरशाचं छोटं टेबल हलवत होता
आणि मी क्षणार्धात हादरलो—
छोट्या टेबलाचा आरसा माझ्यासकट हललेला,
मला स्पष्ट दिसला होता....

सप्टेंबर १९८६

## दंव

मी घरी परततो तेव्हा
फाटकाच्या कडीवर
दंव साचू लागलेलं असतं.

तू दार उघडतेस.
माझे थकलेले शब्द
तुझे समजूतदार निःशब्द.
तुझ्या बोटांची हळुवार नक्षी
माझ्या केसांतून.
तुझ्या नजरेतल्या टवटवीत कळ्या
उमलत जातात माझ्यातून
आणि निखळत जातात
दिवसभरातले दुखरे हिशोब.

नंतर माझ्या तळहातावर प्रकाशत जाते
तुझ्या भांगातली चंदेरी छटा
आणि आपण दंवाचे होत जातो....

१५·११·८०

# आजोबा

चिमुकल्या गादीवर तुझ्या शेजारी
बाहुली निवांत झोपलेली.
कापडातून उरलेल्या तुझ्या फ्रॉकच्या
फ्रॉक तिला घातलेला.

तू मध्येच चुळबुळतेस,
बाहुलीला बिलगतेस,
विसकटतात केस बाहुलीचे.
बाहुली किंचित किरकिरते—

माझ्यासमोरच्या आरशामधून
शुभ्र मिशांचा, बनियनवाला
एक आजोबा चष्म्यातून बघतो,
मिशीमध्ये मिश्किल हसतो....

१८·२·८४

# फिनिक्स

ठिकऱ्या झालेल्या आवाजात
ती भयानक बातमी सांगितलीस आणि--
सर्वांग जाळीत जाणारी
थंडगार वीज
माझ्यावर तुटून पडली;
मी क्षणार्धात थंड राखेचा पुतळा झालो.

फिनिक्स पक्षी पुनर्जन्मण्याआधी
राख थोडी तरी उबदार असावी लागते....

३१·१०·७८

# उमज

कातरत्या सावल्यांच्या प्रदेशात
माझं मन फुटून हंबरलं :
'माझा पहाटमोगरा हरवलाय—
सांगा कोणी पाहिला का?....'

गर्द झाडांची पानं स्थिरावली,
अनेक काळोखे रस्ते दाखवीत,
सुन्न बर्फगारवा आजूबाजूस दाटू लागला.
फिक्कट चंद्र जरा सरकला,
पाचोळा करकरला—

पहाटमोगऱ्याचा प्रवास मला उमजला....

६·११·७८

## फुंकर

अचानक जळालेली वेल
सळसळणाऱ्या वृक्षावरून
ओरबाडून काढली तेव्हा
वृक्षाला कळलं,
वेलीचा त्यालासुद्धा आधार होता.
फांदीवरचे पक्षी उडून गेल्यावर,
संध्याकाळची उतरती किरणं
आता कोण वाटून घेणार होतं?

काही काळ वृक्ष असाच
चिंतनमग्न एकटा सळसळत राहिला,
त्याच्या कळत-नकळत त्याच्याभोवती
नव्या वेलीचा विळखा पडला.

वेली, वेली, फुंकर घाल;
वृक्षावर झालेल्या जुन्या जखमा
हळुवार मुळांनी भरून काढ;
दुखऱ्या वळणांना आठवू नकोस.
वेली, वेली, फुंकर घाल....

१७·४·१९८७

## बगीचा

ही ओळीनं लावलेली फुलझाडं
आणि शेजारी
हौशीनं राखलेला हिरवागार चौकोन.

आपण बसलोय एकमेकांत हरवल्यासारखे
आणि मध्येच उंडारलेल्या पक्ष्यांचा किलबिलाट;
आठवणींचा मांडव दरवळतोय.

निघतील जर खऱ्या आठवणी,
निवडुंगासारख्या फोफावतील—
फुलझाडांतून, गवतातून, मांडवातून.
नतर आपणही निवडुंग होऊ,
पक्ष्यांसकट.

हिरव्यागार चौकोनाशेजारी
आपण एकमेकांत हरवून बसलोय,
ठरवून बसल्यासारखे....

२९.९.८२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८
अ. क्र. २५४८८
२५।११।८८

## बहर

सगळ्या झाडांचे बहर थांबवून
एकाच झाडाला बहर आणणारा ऋतू
शोधता आला तर,
बऱ्याच आवश्यक गोष्टी
सहजपणे साध्य होतील

उदाहरणार्थ,
आपल्याला ठरवून एकमेकांचे होता येईल....

१८.९.७७

# तळाव

मला वाटलं :
ते झाड नक्कीच गात असेल,
आपली सगळ्यांची त्याने ऐकलेली गाणी.

मी झाडाच्या दिशेने सुसाट पळालो :
झाड निष्पर्ण !

पाचोळ्याची प्रत्येक लाट
बरोबर घेऊन चालली होती
एक एक गाणं
पुन्हा कधीही न भेटणारं—

मी लाटालाटांचा तळाव झालो....

१७·३·८०

## गर्भखूण

आपल्यातला संवाद
जाईने टिपून घेतला—
ती गर्भार होती ना,
तेव्हाची गोष्ट.

नंतर आम्ही दोघेच राहिलो :
मी आणि चंद्र.
जाईची फुलं टपटपत होती
निःशब्द....

३१·१०·७६

# अर्थ

आश्वासक सोनकिरणांनी माखलेल्या
सकाळच्या वेळेमधून,
उदासपंखी मिटत जाणारी संध्याकाळची वेळ
वजा केल्यावर काय उरतं,
ते तुला एव्हाना ठाऊक झालंच असेल.

मी तुला देऊ केलेल्या
निर्वासित शंख-शिंपल्यांच्या
प्रदेशातून चालता-चालता,
तुझ्या तळपायांचा आकार बदलल्याचंही
तुला एव्हाना जाणवलं असेल.

ह्या दिवस-रात्रींची रूपं-बेरूपं
तुझ्याभोवती वेटाळत जाताना,
माझ्या अशा त्रयस्थ
क्षितिजाकडे पहात रहाण्याचा अर्थ,
वेगळा असू शकेल का ?

फेब्रुवारी १९८७

## पापुद्रा

तुझ्या-माझ्यातले संदर्भ
आता हळू-हळू निसटू लागले आहेत,
जुनाट भिंतीच्या रंगाच्या
निर्जीव, हलक्या पापुद्र्यांसारखे.

मनावर एकही घाव होत नाही
आणि भिंतीला रंग काढण्याचं
पुन्हा मनातही येत नाही....

शक्य आहे,
एखादा पापुद्रा मध्येच थरथरेल
जिवंत झाल्यासारखा;
पुन्हा स्थिरावेल,
कणाकणाने धुळीत जिरण्यासाठी....

१७.५.८१

## पाकोळ्यांच्या राज्यात

आपण एकदा गेलो होतो
पाकोळ्यांच्या राज्यात;
इंद्रधनुष्यं उमटली होती तुझ्या-माझ्यात.
पाकोळ्यांची गाणी एकमेकांना ऐकवत,
गाण्यांतल्या पाकोळ्या हृदयात जपत,
आपण परतलो गुणगुणत-गुणगुणत....

त्यानंतर एकदा तुझ्या कपाटात,
टाचण्या टोचलेल्या पाकोळ्या पाहिल्या.
माझ्या डोळ्यांत नजर खुपसून तू म्हणालीस,
"पाकोळ्यांचं राज्य कधीच मरून गेलंय—"

अजून फडफडतंय हृदय माझं....

२०·७·८४

# परिच्छेद

मी कोचाच्या हातावर
बोटांनी ताल धरीत
गप्पांना पोषक विषय उलगडीत.

तू समोरच बसलेली.
तुझ्या हातात नुकतंच उचललेलं
कुठलंही पुस्तक.

आपल्यामधल्या टीपॉयवर
चहाचा कप निवत चाललेला;
थरथरता पापुद्रा पृष्ठभागावर.

तुझी नजर अजूनही पुस्तकात;
सहजपणे पानंही उलटतेस.

संध्याकाळची तिरीप पंख मिटत
अलगदपणे उतरते खिडकीवर.
चहाच्या रिकाम्या कपाकडे पहात
तू पुस्तक मिटतेस.

"बरं मग—" मी उठतो.
तू लगबगीने कप उचलतेस.

संध्याकाळच्या मिटणाऱ्या पुस्तकातला
मी एक परिच्छेद....

१४·४·८२

## गृहप्रवेश

आपल्या घराचं कुलूप उघडून
मी एकटाच आत शिरतो तेव्हा,
माझ्याकडे ढुंकूनही पहात नाही
धूळमाखलं अनाथ सामान.
पंखा फिरू लागतो जबरदस्ती केल्यासारखा.
गॅसजवळच्या काडयापेटीतली प्रत्येक काडी
पेटण्याऐवजी मोडू लागते.
मी थकलेला तसाच पोहोचतो
बिछान्यापर्यंत—
कपाटातले कवितांचे संग्रह
मला गदगदून पाणावल्यासारखे दिसू लागतात....

१-१-८६

# मूड

जसा एकटाच
अथांग वाळूवर,
चांदण्यांच्या लाखो ठिणग्यांत
भस्मलोट बनत जातोय;
जसा एकटाच....

१८·२·७४

## पाडस

पाडस – चिमुरडं
पाडस – गोजिरवाणं
पाडस – पळणारं.

कसा ठाऊक असणार त्याला
पाठून येणाऱ्या वणव्याचा
विक्राळ नग्न वायुवेग ?

पाडस – राख झालेलं....

१८.९.७६

# मित्रा

माझ्या आठवणींतला तू
माझ्याबरोबर समुद्रकाठी फिरायचास,
फुललेल्या कविता ऐकवायचास,
बालकवीत हरवून जायचास.

अचानक आपल्याला जाणवला
दूरवरून येणारा वणवा;
तुझ्या कविता तिथेच टाकून
तू पळत सुटलास,
वणव्यामध्ये सामील झालास.

तुझ्या अक्षराचं प्रत्येक वळण
आता धगधगू लागलं
पण तुझ्या चेहऱ्यावरची रेष
अक्षरात उमटेनाशी झाली.

आता वणवा खूपच जवळ आलाय् !
तुझी सोनउन्हात बागडणारी कविता—
झिमझिम पावसाची, फुलपाखरांची
आता वणव्यात होरपळू लागलीय.

इतकं दिसण्याइतपत तरी
तुझी दृष्टी शाबूत आहे ना ?

१२·१२·७८

## जन्मार्थ

सिमेंट-सळ्यांच्या अजस्र जाळ्यात,
दंतचक्री घरघराटात,
कातकामी स्क्रॅप-ढिगात,
रोखठोक देण्याघेण्यात
जन्मार्थ शोधताना कधी वाटतं
उकिरड्यातल्या कुत्र्यासारखं.

खरं म्हणजे जन्मायचं होतं
दंवभिजल्या आमराईतल्या
निवान्त एकल्या बाकासारखं....

८.९.७४

# आजीचे डोळे

कौलारू छपरांची उबदार घरं
शहरातून नाहीशी होऊ लागली तेव्हा
निवाऱ्याची खात्री बाळगणारे पक्षीसुद्धा
नाहीसे होऊ लागले शहरातून.

आज शहरात उभे
उंच इमारतींचे आखीव आलेख—
हिशोबी, साचेबद्ध.
घड्याळाच्या तालावर
श्वासोच्छ्वास करणारे.

एकविसाव्या किंवा बत्तिसाव्या मजल्यावरील
एखादी आजी,
अजूनही नातवांना सांगत असेल
उबदार घरांच्या, गर्द झाडांच्या
हिरव्यागार सावलीच्या गोष्टी.

आजीचे डोळे भिरभिरत असतील
दूरवर गेलेल्या पक्ष्यांच्या शोधात....

२९·४·८५

## माझं घर

दोन महिन्यांनंतर मी परततोय
मला वाटत असलेल्या
भिंती-दारांच्या माझ्या घरात.

दार उघडताच दर्प येतो
एका आदिम वस्तीचा.
उंदीर आणि झुरळं
सैरावैरा पळतात निवाऱ्यासाठी,
मुंग्यांची झुंबड उडालेली असते
वाटलंही नव्हतं अशा ठिकाणी;
चुकून उघड्या राहिलेल्या
खिडकीमधून शिरलेल्या चिमणीच्या
दिसतात अनेक ठिकाणी निशाण्या
आणि मी हौशीनं टांगलेल्या कुंडीत
घरट्यांचा पसारा--
गचपणातली दोरी हलल्याचा
केवळ भासच होतोय ना?
मी कसोशीनं प्रयत्नास लागतो
त्यांचं घर माझं करण्याच्या--
अगदी थेट नवीन घर बांधलं होतं
तेव्हासारखा....

१.६.८६

# गवताविषयी थोडंसं

भंगार म्हणून कारखान्याबाहेर
उघड्या टाकलेल्या लेथमशीनवर
साचत गेला धुरळा आणि पाचोळा.
आज भंगारवाल्याच्या स्वागतासाठी उभा
गंजक्या मशीनवर
तरारलेला हिरवा तांडा....

●

काही दिवसांपूर्वी
रोलरखाली घट्ट दाबला गेला
मातीचा कच्चा रस्ता.
नंतर काही दिवस रोलर शांत.
पुढील कारवायांच्या स्वागतासाठी आज उभा.
तरारलेला हिरवा रस्ता....

●

ह्या रक्तावर अधिकार असतो
फक्त उबदार मातीचा
आणि मातीवर?
आठवड्यापूर्वी पुरलेल्या शवपेटीवर
आज उमटलाय
तरालेला हिरवा पट्टा....

३०.५.८६

## पडझड

लोकलचा ब्रेक घट्टावत जातो
आणि
रंगू लागलेल्या साहित्यचर्चेचे
तसेच समकालीनांच्या टिंगल-टवाळीचे संदर्भ
गर्दीतच सोडून,
ते दोघे थकून उतरतात स्टेशनवर दुसऱ्याच्या.
घेतात दोघांत एक चहा.
पुढची गाडी लेट असल्याचा
त्यांना निसटता दिलासा....

सिग्रेट संपत येते तेव्हा,
पहिल्याला भेडसावू लागते घराची समस्या
आणि दुसऱ्याला धंद्यामधील मंदीची,
बायकोच्या ऑपरेशनची चिंता....

गाडीचा दिवा दूरवरून सरकत येतो.
पहिला जातो.
आणि गाडीची निमुळती धडधड
ताणत जाते त्यांच्यातलं अंतर—
सुनसान रस्त्यावरून दुसरा घरी एकटा....
दुसऱ्या दिवशीही
ते दोघे थकून उतरतात स्टेशनवर दुसऱ्याच्या;
ऐकवतात एकमेकांना रात्रीतून लिहिलेल्या
पडझडीच्या कविता
आणि घेतात दोघांत एक कप चहा....

१९·७·८१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# समाधान

जोवर
त्या हत्तींची झुंड माझ्या दिशेने येत नाही
तोवरच गजगतीतील सौंदर्य मी सांगू शकतो.

कधी खूप वाटते भीती
संरक्षक कवच तडकण्याची—
तेव्हा मी छाती फोडून गातो दणकट पोवाडे.

मला ठाऊक आहे,
तुम्ही माझ्याकडे पाहून हसताय!
मीसुद्धा तुमच्याकडे पहात
समाधानाने हसतोय,
त्याच कारणासाठी....

१४·४·८२

# दिड्दा

मुलाच्या मते,
बापाने सतारीत जन्म नासवला....दिड्दा.
बापाच्या मते,
मुलाने सतारीशिवाय जन्म नासवला....दिड्दा.

एके दिवशी बापाची तार
तन्कन् तुटली.
मुलाने सतार तिरडीवर बांधली.

नंतर चिता धडाधड पेटली;
सतार फुटली,
फट्दा....

२०.५.८५

# प्रवास

एखाद्या दूरच्या प्रवासात
आपली आणि त्यांची ओळख होते.
आपण एकत्र जेवतो, पत्ते खेळतो,
क्वचित मनाची डायरी
एकमेकांना वाचून दाखवतो.

खिडकीबाहेरून पळणारा एखादा गुलमोहर
नजरेत जपावा तसा,
चिटोऱ्यावरच्या नकाशासकट
टिपून घेतलेला त्यांचा पत्ता
आपण जपून ठेवतो जमेल तिथे.
प्रवास संपत येतो तेव्हा
सुरू होते बांधाबांध सामानाची.
इंजिनाचा धूर मध्ये आल्यासारखे
आपण एकमेकांना धूसर होत जातो.
प्लॅटफॉर्मवरच्या कोलाहलात धडपडत उतरतो.
ते आपल्याजवळ असूनही
आपल्याला दिसेनासे होतात
आणि त्यांना आपण....

२०·२·८३

## बॅग

ह्या बॅगेमध्ये तसं सगळं असतं :

कागद, लेटरहेड्स, पेन-पेन्सिली,
ड्रायव्हिंग लायसन्स, रक्तदान-नोंदी;
चेकबुक, पासबुक, पर्चेस ऑर्डर्स,
गुळगुळीत पॉकेटबुक, टेलिफोन-नंबर्स,
चाव्यांच्या जुडगा, सँडविचचा डबा.

कधी गर्दीत धक्का लागून
बॅग अचानक आ वासते.
बॅगेच्या तळाची कवितांची वही
पानं भरून श्वास घेते.

२४·४·८२

# मजल

जिथे भल्याभल्यांनी
लक्तरं दाखवीत फिरण्याचा धंदा
किफायतशीरपणे करून दाखवला
तिथे केवळ लंगोटी नेसून
टाहो फोडणाऱ्या भिकारणीचा काय दोष?

आमच्या शिव्याशापांची मजल आहे
भिकारणीच्या चिंधीपर्यंत—
त्यापुढे जाणं म्हणजे
सदैव भीती
आपलीच लक्तरं उघडी पडण्याची....

ऑक्टोबर १९७७

# स्वरचौकट

दगडी इमारतींवरुन हळुवार उतरणारी
चिंतनशील संध्याकाळ.
आर्ट-गॅलरीमध्ये नसतं आज एकही प्रदर्शन.
पायरीवर एखादी जोडी
एकमेकांत मश्गूल होत जाणारी,
रस्त्यावर तुरळक वर्दळ
आपल्याच पावलांच्या दिशेत मग्न,
गर्द झाडीत परततो एखादा
पक्ष्यांचा छोटासा चुकार थवा—
मिसळत जातो धूसर चित्रात
गडद होत जाणाऱ्या....

आणि अचानक छेदत जातो
आंधळ्या भिकाऱ्याच्या दुखऱ्या तानेमधून
सरसरणारा एक सूर :
'आये बहार बनके, लुभाकर चले गये....'
सूर विस्तारत जातो,
शोधत जातो दूरवर काहीतरी
आणि थरथरती संध्याकाळ
एका स्वरचौकटीत स्तब्ध....

२९·४·८५

# टाळेबंदीची कविता

मालक :
नव्या धंद्याच्या योजनेत दंग.

युनियनवाला :
नव्या संपाच्या लढ्यास सज्ज.

पाऊस फुटून कोसळतोय.

मोडीत निघाल्या कारखान्यासमोर
अनवाणी कामगार उभा चिंब—
बंद फाटकावर खरडलेल्या घोषणा,
गंजून ओघळतायत....

५·७·७७

# कागदी तारा

उत्तररात्री जागा झालो तेव्हा,
घड्याळाने बदलली होती तारीख :
'शनिवार/२५/१२ वा महिना',
कॅसेटमधल्या 'जिंगलबेल्स'
अजून कानांत किलबिलत होत्या.
भेटकार्डातल्या शुभेच्छा
नाइटलॅंपच्या प्रकाशात चमकत होत्या.
ताज्या डोनट्सचा गोडसर वास
खोलीभर तरंगत होता.

मी घराबाहेर पडलो.
दंवभिजल्या थंडीमध्ये
सिग्रेटचा खोल झुरका घेत
चांदण्या आकाशात नजर लावून
दिव्य तारा शोधू लागलो.

सिग्रेट संपत आली तेव्हा
ताऱ्याशिवाय घरी परतलो;
झोपून गेलो.

नंतर स्वप्नात मेंढपाळ आला.
म्हणाला,
"मला दिसतो फक्त तारा."
निष्पाप पारदर्शक दोन डोळे
माझ्या तळव्यावर ठेवीत म्हणाला,
"ह्यांतून बघ, दिसेल तारा—"
"तुझे डोळे देशील मला?"

मला पाहून भांबावलेला,
डोळे जपण्यास धडपडताना,
मेंढपाळ हसला, निघून गेला;
जाता-जाता मला म्हणाला,
"दिसेल फक्त कागदी तारा...."

नाताळ १९८२

## शिल्प

खोल विहिरीच्या तोंडाशी जाणवणारी ऊब
किंवा लांबच लांब बोगद्याच्या शेवटाशी
जाणवणारी प्रकाशाची चाहूल—
इतकाच संबंध माझ्याशी त्याचा.

कधी आपण रेखाटत जातो एखादं सामान्य चित्र
आणि दुसरंच कोणीतरी
रेषा उमटवत जातं असामान्य.

मी सहज घडवायला घेतलं उबदार प्रकाशाचं शिल्प
आणि त्याचीच आकृती शिल्पातून प्रकटली—
कधी आली माझ्या हातात क्रूसाची छिन्नी ?

माझ्या सर्व दिशांना त्याची अनेक शिल्पं
आणि मी शिल्पाचा जिवंत दगड....

सप्टेंबर १९८५

## मनाली

बर्फाच्छादित शिखरांना सूर्यानं डिवचणं
आणि ढगांनी शाकारणं
ह्यावरच ठरतात
इथल्या थंड वाऱ्यांचे प्रवास.

बर्फाचं घरंगळणं, नदीचं खळखळणं,
फुलांचं झुंबडणं, पक्ष्यांचं किलबिलणं
इथे उमटतं,
एखादा आनंदमय क्षण सहज आठवावा तसं.

कमी-अधिक हिरव्यात मिसळल्या,
निळ्यात मिसळल्या,
जांभळ्यात मिसळल्या,
शुभ्रात मिसळल्या,
करड्यात मिसळल्या
ह्या चित्राची प्रत्येक चौकट
पुन्हा तशीच कधीही न उमटणारी—

आणि सतत रंगवणारा कुंचला
असतो तिथेच कुठेतरी,
एखाद्या भगव्या छटेआड....

३०.५.८६

# सह्ज

किती सहजपणे इतके बदलले :

ह्या घोषणांनी त्यांचे पती,
क्रांतिगीतांनी त्यांचे संदर्भ,
पोलादी पावलांनी त्यांचे पहारे,
बेड्यांनी त्यांचे हात,
बेलगाम संगिनींनी त्यांचे मोर्चे,
आरोळ्यांनी, बलात्कारांनी त्यांची घरं,
किती सहजपणे इतके बदलले.

तितक्याच सहजपणे
सूर्य रोज उगवतो नव्याने,
सूर्य रोज मावळतो नव्याने....

१८·९·७७

# गुहा

रक्तपेशींतून ठामपणे झिरपत जातात,
द्वेषाच्या गडद लाटा
आणि अनेक दिशांनी
पांगळ्या होत जातात संवेदना.

पापण्या होत जातात अधिकाधिक कोरड्या
आणि धूसर पडदा जमू लागतो बुबुळांमागे.
हातांचे तळवे निब्बर होत जातात
आणि बोटांतून रसरसतो कस लोखंडाचा.
टाचा होत जातात ठोकीव नालेसारख्या
आणि अंगावरचे केस भराभर लागतात वाढीला.

आतापर्यंत रक्ताचा मूळ घटक असतो बदललेला,
जो ओळखेनासा होतो आपल्याच रंगाला.
आतापर्यंत गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या
अद्ययावत् इमारतींच्या वस्त्या
बनलेल्या असतात, दबा-धरल्या गुहा....

२०·७·८१

# नंतर असं झालं

नंतर असं झालं :
कंदिलांपेक्षा मशाली लोकप्रिय झाल्या;
भाल्यावरच्या निशाणांचा
जमावाला लोभ जडला.

पूर्वेकडच्या वस्त्या पेटल्या
आणि भूपाळ्या सुरू झाल्या;
उबदार रानातले पक्षी खूपच बावरले,
चिवचिवाट-किलबिलाट, चिवचिवाट-किलबिलाट
प्रत्येक झाडात सुरू झाला.

नंतर असं झालं,
पश्चिमेकडच्या वस्त्या पेटल्या
आणि संध्या सुरू झाल्या.

नंतर असं झालं,
बेकारीला कंटाळून सूर्याने केली आत्महत्या....

२२·७·७७

## एका दंगलग्रस्त खेड्यात

वेशीवरच, वादळात उन्मळलेल्या वृक्षाने
वाकडीतिकडी मुळं खुपसून,
आभाळ घायाळ केलं होतं.
सुन्न पाऊलवाट
निमूटपणे सरकत गेली.

लाकडी पट्ट्या ठोकलेली बंद दुकानं,
गल्ल्या-बोळी भोसकणारी कुत्र्यांची मृत्युगीतं,
करपट वासाने थरथरणारी कौलं,
दगडविटांच्या ढिगाऱ्यात
माड्यांचे काळतोंडी सांगाडे,
शामळाजींच्या भंगलेल्या मूर्ती आणि
मक्केच्या तडकलेल्या तसबिरी,
शेणाने सारवलेल्या ओट्याजवळ
सुकलेल्या रक्ताची सारवण,
चिंध्या झालेली पोलकी —

सगळं पहात जाताना जेव्हा
सोनेरी केसांच्या बाहुलीचे
रक्तबंबाळ कपडे दिसले तेव्हा,
घराघरातून डोकावणारी
चेहऱ्यांची प्रेतं ओलांडीत,
खाचखळग्यांतून धपापत
वेशीवर आलो.

उन्मळलेल्या वृक्षाच्या अजून हिरवट दिसणाऱ्या
पानांचा आधार घेऊन
वेस ओलांडली....

१५·८·७७

## जहर

ते आपल्याला हसायला सांगतायत—
आपण हसतोय.
ते आपल्याकडे दगड मागतायत
कवट्या ठेचायला—
आपण देतोय.

झाडांच्या पायथ्याशी खच पडतोय
अजाण बालकांच्या रक्त-मांसाचा;
पानं मुठीत धरून झाडं चुपचाप उभी.

आपण लिहितोय, वाचतोय, वाद्यं वाजवतोय,
नृत्य करतोय, शिल्प घडवतोय;
आपण झाडाचं चित्र रंगवतोय,
झाडाखाली फुलांचे सडे दाखवतोय....

कुठलं हे विचित्र जहर
भिनत चाललंय आपल्या रक्तात?
ह्या बोटांच्या का होत नाहीत सुऱ्या,
आपल्याच धमन्या चिरून टाकणाऱ्या?

१·६·८३

# मेल्यानंतर

मेल्यानंतर
दहन काय, दफन काय
गिधाडांच्या घिरट्या काय;
दाटून येतात सगळेच पाय
एकाच ठळक रेषेमध्ये—
मेल्यानंतर!

७·६·७३

## सौदा

मी वादळं दाखवीत फिरायचो तेव्हा
कुठल्याशा भीतीने तुम्ही दूर पळालात;
मग मी वादळं वाटू लागलो तेव्हा
असून नसल्यासारखे तुम्ही बसलात.

आज मी नाइलाजाने वादळं विकायला काढलीयत!
किंमत मोजण्यासाठी इतका आटापिटा कराल—
वाटलं नव्हतं!

३०.८.७८

# किंवा

आजूबाजूला झाडांची गर्द राई
किंवा सर्वदूर पसरलेलं भकास माळरान.

प्रसन्न झऱ्यांचा खळखळता आनंद
किंवा थेंबभर पाण्यासाठी जीव जळणारा.

डोक्यावरून झंकारत जाणारा पक्ष्यांचा थवा
किंवा कान फुटून जातील इतका शुकशुकाट.

उबदार मातीचा आश्वासक आधार
किंवा रखरखीत जमीन तळवे सोलणारी.

मी ह्या बेटावर मनमुराद भटकतोय
किंवा पाषाणवत् जखडलेला....

२०.७.८४

## संस्था

घोषणा देणाऱ्या मुक्यांचा
आणि
घोषणा ऐकणाऱ्या बहिऱ्यांचा
सुधार करणारी वैद्यकीय संस्था
स्थापन होण्याच्या प्रतीक्षेत
मी उभा—
मुका-बहिरा....

२२·१०·७७

## घोडे

नाचवीत गेलो आम्ही
एकमेकांपुढे,
आपापल्या दिमाखाचे घोडे;
घोडे खूपच वाढत गेले.

आम्ही मस्तीत झिंग.

लवकरच आमचा खच पडला.
आमच्यावर बेताल नाचत राहिले
असंख्य घोडे....

३०·१०·७८

## पक्षी

हा पहा
समोर भिरकावलेले दाणे
निमूटपणे टिपणारा
कालचा एक मनसोक्त पक्षी.

गरज उरली नाही आता
आजूबाजूच्या जाळीची
किंवा पायात गुंतवलेल्या
एखाद्या धाग्याचीही.

ह्याचे दोन स्वच्छंदी पंख
आपोआप गळून पडतील गरजेअभावी,
कालांतराने—
आणि काहीही न जाणवून
पक्षी टिपतच राहील,
समोर भिरकावलेले
असतील ते दाणे....

३०.५.८६

# कुत्रा

द-या-डोंगरांतून सणाणत आलेला ससाणा
गलोल गिरक्या घेत उतरू लागला;
जमिनीलगत येता-येता
त्याचा जंगली पोपट झाला;
जमिनीवर उतरल्यावर
त्याचा उमदा घोडा झाला;
घोडा वर्तुळात फिरता-फिरता
त्याचा पाळीव कुत्रा झाला;
फिरून-फिरून कुत्रा दमला
माझ्या जिभेला घाम फुटला....

मार्च १९८७

# युद्ध

युद्धाचे नुसतेच डावपेच रचले,
मश्गूल होऊन विजयचित्र रंगवले.

युद्ध कधी होऊन गेले—
समजलेच नाही.

सभोवती रोवलेल्या पिंजऱ्याच्या गजांवर
विजयचित्र लटकवून टाकले....

१८.८.७९

## किनारा

समुद्रनादाचे असंख्य पक्षी फडफडताना
मीसुद्धा असतो
किनाऱ्याचा एक अपरिहार्य तुकडा.

पक्षी किनाऱ्याकडे झेपावू लागतात.

माझ्याजवळ त्यांच्यासाठी जागा नसते
आणि त्यांना परतवण्याचं
बळही नसतं....

२२·९·७६

# ज्ञानी

ज्ञानसाधनेतून जागा झाल्यावर त्याला दिसली
लखलखीत रत्नांनी ओसंडलेली
नक्षीदार सुवर्णपात्रं,
निमुळत्या बोटांच्या कमनीय हातांतली
मदिरेची स्फटिकपात्रं,
दाही दिशांना सन्मुख असलेली
राजबिंडी सिंहासनं
आणि
ओलसर वाटेवर धुक्यात उमटलेली
खडावांची पावलं.

तो धुक्यात अदृश्य झाला....

१८.९.७७

# घर

भिंतींना लहान-लहान भेगा पडू लागतात तेव्हा
कसोशीने प्रयत्न होतो भेगा बुजवण्याचा.
भिंती सुरकुतू लागल्यावर भेगांच्या जाळ्याने
आणि निसटू लागल्यावर गिलाव्याचे ढलपे,
पुन्हा काही प्रयत्न होतात डागडुजीचे.

मग रहातं घर कोसळण्याची चिन्हं दिसू लागतात;
एक मोठी थरथर अपेक्षित असते भिंतींना—
बाडबिस्तरा बांधून देखावा केला जातो घरदुरुस्तीचा....

छताकडून पडू लागतात नंतर भिंतींना भगदाडं,
कुंपणाच्या तारा फाटकासकट लुबाडल्या जातात—
घर :
एक ओसाड जागा....

२३·६·८१

# झोपाळ्याचा मृत्यू

त्या वाड्यात अनेक वर्षं वावरतात
आपल्याच सावल्यांत विरघळलेली माणसं;
दारांची उघडझाप,
कड्या-कुलुपांचं ठळक अस्तित्व.

डार्विनचा सिद्धान्त
पाठ आहे भिंतीभिंतींना,
भिंतींत जोपासलेल्या संस्कृतीला,
वाड्याभोवती वाहणाऱ्या वाऱ्यांना.

वाड्याबाहेरील उजाड बगिच्यात,
वर्षांपासून साजरा होतोय
भग्न मांडवाखालचा
भयाण मृत्यू झोपाळ्याचा....

२५·३·७६

## संदेश

गुरुदेव,
माफ करा. पण आज बाजूला ठेवतो
आम्हांला अबोल करणाऱ्या
तुमच्या पुरस्कारांच्या चळती
आणि विचारतो काही छळणारे प्रश्न.

गुरुदेव,
तुमची स्वतालावर झुलणारी धून
आणि आयुष्याला बेदरकार सामोरं जाणारं कथांचं विश्व,
तुमच्या मधुरा-मुलायम कवितांच्या ओळी
आणि चित्रांतून फटकारणारे
ओबडधोबड रंगांचे जोरकस आसूड,
तुटून पडले होते का कधी एकमेकांवर ?
त्या झटापटीचं काय झालं ?

गुरुदेव,
लागली होती का तुमच्या लेखणीला
तुमच्याकडूनच एखादी जबरदस्त ठेच ?
हरवला होता का कधी शब्दांचा आकार
आणि कासावीस झाला होता
पारदर्शक तलावातला राजहंस ?
नंतर कसे सावरलात ?

आणि आता एकच :
होती का हो गुरुदेव,
तुमच्या काळातसुद्धा,
एकटयादुकटयास टोचून मारणारी
डोंबकावळ्यांची जमात ?
तुम्ही कसे तगून राहिलात ?

गुरुदेव,
आठवा, सांगा,
काहीतरी व्यक्त करा,
नका बघू असे तसबिरीमधून
एखादी शिक्षा ठोठावत असल्यासारखे.
काहीतरी संदेश द्या....

३१·२·८६

## सुगंधी माती

आपलं वय म्हणजे
आपल्याला दिसलेल्या नव्हे तर,
उमजलेल्या पावसाळ्यांचं गणित असतं;
ज्याच्या उत्तरातून सूर धरतं,
आयुष्याचं पाऊसगाणं....

एखाद्याशी आपलं नातं,
एकत्र असताना जे वाटतं त्याहून
दूर गेल्यावर जे वाटतं तेच असतं....

आपल्या मावळतीच्या प्रवासापर्यंत
रुजत जातात आपल्या आत आत
हीच पाऊसगाणी, हीच नाती;
नंतर उरते
फक्त सुगंधी माती....

२३·३·८६

REFBK-0025488
REFBK-0025488

ह्या संग्रहात समाविष्ट करण्यात आलेल्या कविता खालील नियतकालिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झाल्या आहेत :

सत्यकथा, मौज, अनुष्टुभ, पूर्वा, युगवाणी, साहित्य, हंस, दीपावली, ऋचा, प्रतिष्ठान, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकप्रभा, मराठवाडा, अस्मितादर्श, कविता, संवाद, स्वच्छंद, लोकदूत, साहित्य-शिवार, पुष्कळा, पुढारी, छंद, उद्गार, पालवी, नवोदिता, शब्दांगण, केसरी, चैत्रवेल, नवशक्ती, विशेष, सुवार्ता, सकाळ, गावकरी.